मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# खेडमध्ये भीषण अपघात; 7 महिला भाविकांचा मृत्यू

## पिकअपवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि पिकअप थेट शंभर फूट खोल दरीत कोसळला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यातील कुंडेश्वर येथे दर्शनाला जात असताना पिकअप दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात सात महिला भाविकांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला असून ३० पेक्षा अधिक महिला जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर चाकण आणि इतर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, खेड तालुक्यातील कुंडेश्वर येथे पाईट परिसरातून काही महिला भाविक श्रावण सोमवारनिमित्त दर्शनासाठी पिकअपने चालल्या होत्या. भरधाव पिकअप नागमोडी वळणावर घाट चढत असताना अचानक रिव्हर्स आला. पिकअपवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि पिकअप थेट शंभर फूट खोल दरीत कोसळला. या भीषण अपघातात गंभीर जखमी होऊन जागीच सात महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर ३० पेक्षा अधिक महिला जखमी आहेत.

ही घटना आज दुपारी एकच्या सुमारास घडली आहे. घटनेची माहिती कळताच रुग्णवाहिकेतून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




### भाविकांच्या वाहतुकीसाठी सुरक्षित पर्यायांची कमतरता

» श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणावर भाविक मंदिरांमध्ये दर्शनासाठी प्रवास करतात. अशा वेळी विशेषतः ग्रामीण व डोंगराळ भागांतून येणाऱ्या भक्तांसाठी सुरक्षित व सार्वजनिक वाहतूक पर्यायांचा अभाव दिसून येतो. त्यामुळे भाविकांना खासगी जीप, पिकअपसारखी अपुरी व असुरक्षित वाहने वापरावी लागतात. भाविकांच्या जीविताला धोका पत्करूनच का दर्शनाचा प्रवास करावा लागतो आहे. प्रशासनाने अशा काळात अतिरिक्त एस.टी. बस सेवा किंवा सुरक्षित प्रवासासाठी स्थानिक पातळीवर मार्गदर्शक नियम लागू करणे आवश्यक आहे.

---

# मालमत्ता कर थकबाकी नसल्याचा दाखला घरबसल्या

## चार वर्षात 64 हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला थकबाकी नसलेल्याचा दाखला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ता कर थकबाकी नसलेला दाखला बसल्या मिळावा यासाठी मार्च २०२२ पासून ऑनलाईन सुविधा सुरू केली आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत १३,२१३ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

यापूर्वी, नागरिकांना थकबाकी नसल्याचा दाखला मिळवण्यासाठी महापालिकेच्या कार्यालयात जाऊन अर्ज करावा लागे. अनेक वेळा कार्यालयात फेरफटका मारावा लागत असल्यामुळे नागरिकांना वेळ आणि श्रमाचा अपव्यय होत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी, कर आकारणी विभागाने महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर ही सेवा उपलब्ध करून दिली आहे.

२०२२ ते जुलै २०२५ पर्यंत एकूण ६४ हजारांहून अधिक नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने थकबाकी नसल्याचा दाखला घेतला आहे. ही सेवा सुरू झाल्यापासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आता ते घरबसल्या विना शुल्क दाखला डाउनलोड करू शकतात.

**वर्षानुसार ऑनलाईन दाखले घेणाऱ्यांची संख्या:**

२०२२- २३ : ४,७२५
२०२३- २४ : १६,९०६
२०२४-२५ :२९,७५७
२०२५- २६ (जुलै अखेरपर्यंत) :१३,२१३




“ महापालिकेच्या कामकाजात डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून नागरिकांना घरबसल्या सेवा मिळाव्यात, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. मालमत्ता कर विभागाने सुरू केलेली ‘थकबाकीदार नसल्याच्या ऑनलाईन दाखल्याची’ सुविधा हा त्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. नागरिकांचा वेळ वाचावा, त्यांना कोणतीही अडचण न येता आवश्यक कागदपत्रे सहज मिळावा, हाच आमचा उद्देश आहे.

**- प्रदीप जांभळे पाटील- अतिरिक्त आयुक्त, पिंपरी- चिंचवड महापालिका.**

“ थकबाकीदार नसल्याचा दाखला ऑनलाईन मिळू लागल्यामुळे नागरिकांची खूप मोठी गैरसोय टळली आहे. आधी लोकांना कार्यालयात यावं लागायचं, वेळ जात होता, कागदपत्रांची दगदग होती – आता हे सगळं टळलं आहे. नागरिक घरबसल्या ही सेवा वापरत आहेत, याचा आम्हाला आनंद आहे. ही सुविधा आणखी सोपी आणि उपयुक्त कशी करता येईल, यावर आमचा भर आहे.


**- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त कर संकलन विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# अनधिकृत फलक लावल्यास फौजदारी गुन्हे

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय; चार महिन्यांत 47 हजार फलकांवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील अनधिकृत फलकांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. आकाश चिन्ह व परवाना विभागाने एक एप्रिल ते ३१ जुलै या चार महिन्यात ४७ हजार १३ पोस्टर्स, फलक, किऑस्कवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून चार लाख ६८ हजार रूपयांचा दंड वसूल केला आहे, तर एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता शहरात अनधिकृत फलक लावणाऱ्यांविरूद्ध कडक मोहीम राबविण्यात येणार असून, संबंधितांवर दंड आकारण्याबरोबरच फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत.




पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक ठिकाणी लग्न, वाढदिवस, स्वागत, निवडणूक, धार्मिक व अन्य कार्यक्रमांचे अनधिकृत फलक लावले जातात. यामुळे शहर विद्रुप होते. वाहतुकीसही अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अनधिकृत फलक लावू नयेत यासाठी सर्व राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी व शहराध्यक्षांनाही महापालिकेने पत्राद्वारे आवाहन केले.

आकाश चिन्ह व परवाना विभागाच्या वतीने वेळोवेळी अनधिकृत फलक, पोस्टर्स, किऑस्कवर कारवाई केली जात आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील विविध चौका-चौकात फलक लावले जात आहेत. आगामी काळात दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, दिवाळी असे मोठे सण आहेत. या पार्श्वभूमीवर शहरात अनधिकृत फलक लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने कडक भूमिका घेतली आहे. अनधिकृत फलकांवर धडक कारवाई सुरु केली आहे.

शहरात कोणतीही व्यक्ती, संस्था, व्यापारी, उद्योजक, राजकीय कार्यकर्ते यांनी महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता जाहिरात फलक, किऑक्स लावल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

### विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांना नोटीस

**» शहरात व्यवसाय करण्यासाठी महापालिकेचा परवाना बंधनकारक असताना शहरातील व्यावसायिक, दुकानदार आणि विक्रेते महापालिकेचा परवाना काढण्यास टाळाटाळ करत असल्याचे महापालिकेच्या तपासणीतून समोर आले आहे. त्यामुळे महापालिकेने परवाना न घेणाऱ्या व्यावसायिकांचे सर्वेक्षण सुरू केले. ज्यांनी परवाना घेतला नाही, त्यांना नोटीस बजाविण्यात येणार आहे.**

> शहरात अनधिकृत फलक लावू नयेत. महापालिकेने परवानगी दिलेल्या अधिकृत होर्डिंगवरच जाहिरात करावी. यापुढे शहरात अनधिकृत फलक लावणाऱ्यांवर फौजदारी आणि दंडात्मक कारवाई केली जाईल.
>
> **- राजेश आगळे, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# बस बंद पडल्यास चालक, अभियंत्यांची अर्ध्या दिवसाची वेतन कपात

## पीएमपीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांचा आदेश; कर्मचारी संघटनांचा विरोध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) मालकीच्या बस बंद पडल्यास देखभाल दुरुस्ती अभियंता आणि चालक यांची अर्ध्या दिवसाची वेतन कपात केली जाणार आहे. पीएमपीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी याबाबतचा आदेश दिला आहे. हा निर्णय 'पीएमपी'च्या मालकीच्याच बससाठी घेण्यात आला असून, ठेकेदारांच्या बसबाबत उल्लेख नसल्याने कामगार संघटनेने विरोध केला आहे. त्यामुळे देवरे यांचा आणखी एक निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पीएमपीच्या ताफ्यात स्वमालकीच्या ९६४, तर कंत्राटी १०१९ अशा मिळूण एकूण १९८३ 'पीएमपी'च्या आहेत. त्यापैकी स्व:मालकीच्या ७३७ बसची वेगवेगळ्या आगारांमध्ये दुरुस्ती सुरू आहे. त्यामध्ये तांत्रिक दुरुस्ती, मार्गिकेवर अचानक बंद पडणे, बिघाड यांमुळे फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत. त्याचा फटका पीएमपीच्या उत्पन्नावर होत आहे. हे प्रमाण कमी करून प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यासाठी बस बंद पडण्याच्या घटनांबाबत दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार देखभाल दुरुस्ती विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी देवरे यांनी सूचना केल्या आहेत.




'ब्रेकडाऊन' संदर्भातील उपाययोजना म्हणून बस संचलनात पाठविण्यापूर्वी विभागीय देखभाल दुरुस्ती अभियंता यांनी दुरुस्तीच्या कामांची पूर्तता झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. चालकानेही पडताळणी करून बस मार्गावर न्यावी. संचलनादरम्यान बस बंद पडल्यास अभियंता आणि चालक यांच्या वेतनातून अर्ध्या दिवसाची वेतन कपात केली जाईल, असे देवरे यांनी आदेशात नमूद केले आहे. हा निर्णय पीएमपीच्या ताफ्यातील स्व:मालकीच्या ७३७ बससाठी आहे. कंत्राटदारांच्या पीएमपीबाबत उल्लेख नाही. त्यामुळे कर्मचारी संघटनांनी विरोध केला आहे.

> संचलनातील बस बंद पडणे ही तांत्रिक बाब आहे. एखादी गाडी दुरुस्ती करूनही बंद पडली, तरी नियमानुसार प्राथमिक चौकशी होणे अपेक्षित आहे. चौकशीअंती कारवाई केल्यास हरकत नाही. या निर्णयातून ठेकेदारांच्या चालकांना अभय देण्यात आले आहे. त्यामुळे या निर्णयाला विरोध आहे.
>
> **- सुनील नलावडे, सरचिटणीस, पीएमपी राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार संघटना.**

# नवीन महानगरपालिका, हद्दवाढ 31 डिसेंबरपर्यंतच शक्य

## दोन उपायुक्तांच्या मागणीसही लवकरच मान्यता; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे परिसरातील झपाट्याने झालेले नागरीकरण लक्षात घेता तीन महानगरपालिका स्थापन करण्याची योजना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली असली तरी जनगणनेच्या प्रक्रियेमुळे नवीन महानगरपालिका वा हद्दवाढ ३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करावी, अन्यथा मार्च २०२७ पर्यंत काहीही बदल करता येणार नाहीत, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.



पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका सध्या अस्तित्वात आहेत. वाढते नागरीकरण लक्षात घेता पुणे परिसरात हिंजवडी, चाकण आणि उरुळी देवाची, फुरसुंगी, लोणी काळभोर आणि वाघोली या भागासाठी स्वतंत्र अशा तीन महानगरपालिका स्थापन करण्याची आवश्यकता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. अर्थात, पवारांच्या या प्रस्तावाला शिवसेना शिंदे गट आणि भाजपचा पाठिंबा नाही. यामुळेच अजितदादांनी घोषणा केली त्याच दिवशी पुणे दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीनऐवजी एक नवीन महानगरपालिका स्थापन करण्याचा विचार करता येईल, असे विधान करीत वेगळा सूर लावला.

**जनगणना प्रक्रियेमुळे खोळंबा!**

जनगणनेची प्रक्रिया एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या काळात राबविली जाणार आहे. २०२६ मध्ये घरांची नोंदणी, एकूण किती घरे आहेत, घरात फोन, इंटरनेट वगैरे माहिती गोळा केली जाईल. १ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करतील. १ मार्च २०२७ या दिवशी १६व्या जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

जनगणनेची ही सारी प्रक्रिया लक्षात घेता ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महानगरपालिका, हद्दवाढ, जिल्हा किंवा तालुक्यांच्या सीमांमध्ये बदल करायचा असल्यास करावा, असा आदेशच ‘रजिस्टर जनरल ऑफ इंडिया’ने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना दिला आहे.

१ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सव्वा वर्षाच्या कालावधीत जिल्हा, तालुका वा महानगरपालिकांच्या सीमांमध्ये बदल करता येणार नाही. यामुळेच अजित पवारांनी सुचविलेल्या तीन महानगरपालिकांची स्थापना डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करावी लागेल अथवा २०२७ नंतरच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल.

### जिल्हा विभाजन रखडले

» राज्यात नवीन जिल्हे व तालुक्यांच्या निर्मितीची अनेक वर्षांची मागणी आहे. राज्यात १ ऑगस्ट २०१४ मध्ये पालघर या राज्यातील ३६व्या जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर गेल्या ११ वर्षांमध्ये जिल्हा विभाजन वा नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आलेली नाही. राज्यात गेल्या वर्षी जालना महानगरपालिकेची स्थापना झाल्याने महापालिकांची संख्या २९ झाली आहे.

# स्वारगेट परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट

## दोन वेगवेगळ्या घटनेत चोरट्यांनी एक लाख दहा हजारांचा ऐवज लांबविला

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट एसटी स्थानक परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. दोन वेगवेगळ्या घटनेत चोरट्यांनी एक लाख दहा हजारांचा ऐवज लांबविला. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




स्वारगेट परिसरात पीएमपी प्रवासी ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविल्याची घटना नुकतीच घडली. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला सिंहगड रस्त्यावरील आनंदनगर भागात राहायला आहेत. त्या स्वारगेट पीएमपी स्थानकात बसमध्ये प्रवेश करत होत्या. त्या वेळी चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले.

दुसऱ्या एका घटनेत स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात एका प्रवाशाकडील सोनसाखळी चोरट्यांनी लांबविली. याबाबत एकाने फिर्याद दिली आहे. तक्रारदार महाडला निघाले होते. एसटी बसमध्ये प्रवेश करताना चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी लांबविली. या प्रकरणी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. चोरट्यांनी दोन घटनांमध्ये एक लाख दहा हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविले.

स्वारगेट एसटी स्थानकातील बसमध्ये प्रवासी तरुणीवर बलात्कार केल्याची घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. तरुणीला धमकावून बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्यानंतर सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला होता. बलात्कार प्रकरणानंतर स्वारगेट परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पोलिसांची गस्त वाढविण्यात आली. पोलीस बंदोबस्त आणि सुरक्षाविषयक उपाययोजना केल्यानंतर प्रवाशांकडील दागिने, रोकड, लॅपटॉप, मोबाइल संच लांबविण्याचे सुरू आहे.

दरम्यान, मार्केटयार्ड-गंगाधाम रस्त्यावरील एका गोदामातून चोरट्यांनी मोबाइल संच आणि रोकड लांबविल्याची घटना उघडकीस आली. याबाबत रखवालदाराने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रखवालदार आणि त्याचा मित्र गोदामात झोपले होते. चोरट्यांनी गोदामाचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला. रखवालदार आणि त्याच्या मित्राकडील मोबाइल संच, तसेच रोकड लांबविली. पोलीस उपनिरीक्षक दळवी तपास करत आहेत.

### मित्रमंडळ चौकात हार्डवेअर दुकानात चोरी

» पर्वती भागातील मित्रमंडळ चौकात एका हार्डवेअर दुकानाचा दरवाजा उचकटून चोरट्यांनी रोकड आणि बॅटरी असा मुद्देमाल लांबविल्याची घटना घडली. याबाबत एका व्यावसायिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार व्यावसायिक हे सहकारनगर भागात राहायला आहेत. त्यांचे पर्वती परिसरातील मित्रमंडळ चौकात हार्डवेअरचे दुकान आहे. चोरट्यांनी रविवारी मध्यरात्री दुकानाचा दरवाजा उचकटून गल्ल्यातील रोकड आणि बॅटरी असा मुद्देमाल लांबविला. रविवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. पोलीस उपनिरीक्षक पवार तपास करत आहेत.

# रक्षाबंधन ठरले 'पीएमपी'साठी विक्रमी

## पीएमपीएमएलने 12 लाख प्रवाशांची वाहतूक करत 2.61 कोटी रुपयांचे विक्रमी उत्पन्न




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपीएमएल) रक्षाबंधनाच्या दिवशी शनिवारी (ता. ९) दोन कोटी ६१ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. हा आकडा विक्रमी ठरला. गेल्या वर्षीच्या तुलनेत उत्पन्नात यंदा तब्बल ७२ लाख आठ हजार रुपयांनी वाढ झाली. यात तिकीट दरातील वाढ हे सुद्धा महत्त्वाचे कारण आहे. 'पीएमपी'च्या इतिहासात प्रथमच एका दिवसात अडीच कोटींचा टप्पा पार केला.

रक्षाबंधनाच्या दिवशी प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त असते. काही नागरिक प्रवासासाठी स्वतःच्या वाहनांऐवजी 'पीएमपी' बसला प्राधान्य देतात. रक्षाबंधननिमित्त वाढणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेता 'पीएमपीएमएल' प्रशासन दरवर्षी मार्गावर जादा बस सोडते. यंदाही पुणे, पिंपरी-चिंचवडसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रात शनिवारी एक हजार ९९४ बस सोडण्यात आल्या होत्या.

'पीएमपी'च्या ताफ्यात ठेकेदारांच्या 'सीएनजी' बसही दाखल झाल्या आहेत. त्यामुळे गेल्या वर्षापेक्षा जादा बस सोडणे शक्य झाले. शनिवारी सुमारे १२ लाखांवर प्रवाशांनी 'पीएमपी' बसमधून प्रवास केला. यामधून दोन कोटी ६१ लाख १९ हजार २७ रुपयांचे उत्पन्न मिळाले. एक जून पासून तिकीट दरवाढ लागू झाल्यामुळे 'पीएमपी'चे उत्पन्न वाढले आहे. रोज सुमारे दोन कोटी ३४ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते.

### आकडे बोलतात

- तिकीट विक्री - २,१६,९९,८६९ रुपये
- पास विक्री- १५,८२,२४० रुपये
- मोबाईल ॲपवरील तिकिटे २७,९९,४१८ रुपये
- पुणे दर्शन सेवा- ३७,५०० रुपये
- एकूण-२,६१,१९,०२७ रुपये


> प्रवाशांची संख्या लक्षात घेत 'पीएमपी'ने यंदादेखील रक्षाबंधनासाठी अतिरिक्त बस गाड्या उपलब्ध केल्या होत्या. शनिवारी सुमारे १४ लाख प्रवाशांनी प्रवास केला असून यातून सुमारे पावणेतीन कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.
>
> **- पंकज देवरे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

> पुणे रक्षाबंधनाच्या दिवशी 'पीएमपीएमएल'ला मिळालेले उत्पन्न हे आत्तापर्यंत मिळालेल्या उत्पन्नापैकी सर्वाधिक आहे. प्रवाशांनी 'पीएमपी'वर दाखवलेला विश्वास आणि चालक, वाहक आणि इतर सर्वांनी घेतलेल्या कष्टामुळे हे शक्य झाले
>
> **- सतीश गव्हाणे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल.**

# जेजुरी येथील झुकलेली पाचमजली इमारत पाडली

## संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात इमारत पाडली





**पुणे | प्रतिनिधी**

जेजुरी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी खोमणे आळी परिसरात पाचमजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. ही इमारत रविवारी (दि. १०) सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अचानक एका बाजूला धोकादायकरीत्या झुकली. त्यामुळे परिसरात धोका निर्माण झाला होता. एकच खळबळ उडाली. भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने सोमवारी (दि. ११) सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास ही धोकादायक इमारत सुरक्षितपणे पाडली.

जेजुरी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी खोमणे आळीतील बांधकामाधीन इमारत रविवारी अचानकच एका बाजूला धोकादायकरीत्या झुकली होती. या घटनेची माहिती मिळताच जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने अग्निशमन दल व रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन रहिवाशांचे सुरक्षित स्थलांतर केले. सुरक्षा बॅरिकेड लावून रहदारी थांबविण्यात आली.

पोलिस अधिकारी व नगरपरिषदेच्या वतीने परिसरातील नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन इमारत परिसरात तत्काळ बंदी घातली. त्यानंतर सोमवारी पहाटे पुणे महानगरपालिकेचे कटर्स दाखल झाले. सकाळी आठ वाजता इमारत पाडण्याचे काम सुरू झाले. त्यानंतर काही वेळातच ही पाचमजली इमारत सुरक्षित पाडण्यात आली.

दरम्यान, इमारत झुकण्यामागील कारणांचा शोध तांत्रिक पथक घेत आहे. त्यामागचे नेमके कारण काय? हे तपास अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. ही इमारत अनधिकृतपणे बांधली जात होती. त्यामुळे इमारत मालकास जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने यापूर्वीच नोटीस दिली होती. आणखी अनेक इमारती अशाच पद्धतीने बांधण्यात येत असून, त्यांनाही पालिकेने नोटिसा दिल्या आहेत. आता या इमारतींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे पालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी सांगितले.

जेजुरीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे आणि कर्मचारी वर्गाने इमारत झुकल्यापासून ते इमारत पाडून मलबा हटविण्यापर्यंत चोख बंदोबस्त ठेवून नागरिकांची सुरक्षा केली. दरम्यान, या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, वाढत्या शहरांमध्ये बांधकामादरम्यान सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाली आहे.